| प्रस्तूत विद्यापीठातील कौशल्य विकास केंद्रामार्फत विद्यापीठाच्या परिक्षेत्राबाहेरील (सोलापूर जिल्ह्याबाहेरील) विविध संस्था/महाविद्यालय यांना कौशल्य अधारित अभ्यासक्रमाची मान्यता देण्याबाबतची नियमावली | |
|---|---|
| १. | पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या परिक्षेत्रा बाहेरील (सोलापूर जिल्ह्याबाहेरील) कौशल्या आधारित अभ्यासक्रम सुरु करण्याकरिता मान्यता मिळण्यासाठी खाली नमूद केल्याप्रमाणे संस्था पात्र ठरतील.<br><br>१. नोदणीकृत शासकीय संस्था/महाविद्यालय/रुग्णालय इत्यादी.<br>२. नोदणीकृत निमशासकीय संस्था/महाविद्यालय इत्यादी.<br>३. नोदणीकृत अनुदानित/विनाअनुदानित संस्था/महाविद्यालय इत्यादी.<br>४. नोदणीकृत खाजगी संस्था/महाविद्यालय/विद्यापीठे/प्रा.लिमिटेड कंपनी/रुग्णालय/औद्योगिक आस्थापना इत्यादी.<br>वर नमूद प्रमाणे विविध संस्था,महाविद्यालय इत्यादी यांना सामुहिकपणे संस्था असे संबोधण्यात येईल. |
| २. | प्रस्तुत विद्यापीठाच्या परीक्षेत्राबाहेरील (सोलापूर जिल्ह्याबाहेरील) संस्थाना कौशल्या आधारित अभ्यासक्रम सामंजस्य करार (MoU) व्दारे विहित तरतुदीचा अवंलब करुन सदर अभ्यासक्रम सुरु करता येईल. |
| ३. | मान्यता घेऊ इच्छिणाऱ्या संस्थेने/महाविद्यालयाने अर्ज करते वेळी खालील बाबीची पूर्तता करणे अनिवार्य आहे.<br><br>१. संस्थेने अथवा महाविद्यालयाने कोर्स सुरू करण्यासंबंधीचा प्रस्ताव विहित नमून्यात आवश्यकत्या कागदपत्रासह परिपूर्ण अर्ज करणे बंधनकारक आहे.<br>२. संस्था/महाविद्यालयाचे मागील ३ वर्षांचे लेखापरीक्षण अहवाल सादर करणे आवश्यक आहे.<br>३. संलग्निकरण घेऊ इच्छिणाऱ्या संस्थेचा/महाविद्यालयाने संस्थेच्या/महाविद्यालयाच्या मालकीची जागा असल्यास जागेचा नजीकचा (recent) सात बारा उतारा जोडणे आवश्यक आहे. जर जागा भाडे तत्त्वावर असल्यास भाडे करार पत्र व जागा मालकाचे संमतीपत्र व तपशिल जोडणे आवश्यक आहे. |
| ४. | कौशल्या आधारित अभ्यासक्रम सुरु करण्याकरिता मान्यता घेऊ इच्छिणाऱ्या संस्थेने/महाविद्यालयाने कौशल्य विकास केंद्राचे अभ्यासक्रम विद्यापीठाने मान्यता दिलेल्या ठिकाणी व निश्चित केलेल्या अभ्यासक्रमानुसार चालवणे बंधनकारक राहील. |
| ५. | कौशल्या आधारित अभ्यासक्रम सुरु करण्याकरिता मान्यता घेऊ इच्छिणाऱ्या संस्थेने/महाविद्यालयाने कौशल्य विकास अभ्यासक्रम सुरु करण्याबाबतचा संस्थेचा ठराव प्रस्तावासोबत व मागणी केलेल्या अभ्यासक्रमानुसार जागा, उपकरणे, ग्रंथालय सुविधा, प्रयोगशाळा, कार्यशाळा (Work shop), भौतिक सुविधा मुबलक प्रमाणात असल्याचे स्पष्ट व सविस्तर माहिती जिओ टॅग फोटोव्दारे देणे बंधनकारक राहील. |

| | |
|---|---|
| ६. | सर्व अभ्यासक्रमासाठी मान्यता ५ वर्षे इतकी असणार आहे. प्रत्येक पॅरामेडिकल अभ्यासक्रमासाठी रू. २५,०००/- व इतर अभ्यासक्रमासाठी रू. १५,०००/- संलग्निकरण शुल्क असेल. |

**शुल्क तक्ता**

| अ.क्र. | प्रथम मान्यता शुल्क | पॅरामेडीकल कोर्से (प्रती अभ्यासक्रम) | पारंपारिक कोर्से (प्रती अभ्यासक्रम) |
|---|---|---|---|
| १ | प्रथम मान्यता शुल्क | २५०००/- | १५०००/- |

| | |
|---|---|
| ७. | ५ वर्षे मान्यता कालावधी संपल्यानंतर पुन्हा नव्याने सामंजस्य करार करणे गरजेचे आहे तसेच प्रस्तुत विद्यापीठ कौशल्य विकास केंद्राने ठरविल्याप्रमाणे प्रती अभ्यासक्रम शुल्क विद्यापीठात जमा करणे अनिवार्य आहे. |
| ८. | ज्या संस्था/महाविद्यालयांना अटी पूर्ततेच्या आधीन राहून मान्यता देण्याची शिफारस करण्यात येईल अशा संस्थां/महाविद्यालयांने ३ महिन्याच्या आत अटीपूर्तता अहवाल सादर करून मान्यता अंतीम करून घेणे बंधनकारक आहे. |
| ९. | एकदा नामंजूर झालेल्या प्रस्तावाचा पुन्हा फेरविचार केला जाणार नाही. परंतु पुढील वर्षी सदर संस्थेस नवीन प्रस्ताव सादर करण्याची मुभा राहील. |
| १०. | मान्यताप्राप्त महाविद्यालय/संस्था मध्ये कौशल्य विकास केंद्राच्या अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या एकूण शुल्कापैकी विद्यापीठाचा निर्धारित वाटा २५% इतका असुन शुल्काची रक्कम अभ्यासक्रम सुरू झाल्यानंतर एका महिन्यात विद्यापीठात जमा करणे संस्थेवर बंधनकारक राहील. या व्यतिरिक्त अभ्यासक्रम निहाय निश्चित करण्यात आलेले परीक्षा शुल्क वेगळे असून याबाबत विद्यापीठाने कळविल्यानंतर सदर शुल्क विद्यापीठाकडे जमा करणे संस्था/महाविद्यालयावर बंधनकारक राहील. |
| ११. | संस्था/महाविद्यालयास अभ्यासक्रमानुसार ठरवून दिलेल्या शुल्कापेक्षा अधिकचे शुल्क घेता येणार नाही. तसे निदर्शनास आल्यास या संबधी शहानिशा करुन आवश्यक असल्यास कार्यवाही करण्याचे व दोषी संस्था/महाविद्यालयाची मान्यता संपुष्टात आणण्याचे अधिकार विद्यापीठास आहेत. |
| १२. | महाविद्यालय/संस्था मान्यता, अभ्यासक्रमाच्या मान्यतेचे नुतनीकरण, विद्यार्थी प्रवेश व इतर अनुषंगीक बाबी संबंधी निर्णय घेण्याचे संपूर्ण अधिकार विद्यापीठ प्रशासनाकडे राहतील. |
| १३ | मान्यता घेतलेल्या संस्था/महाविद्यालयांनी विद्यापीठास दरवर्षी देण्यात आलेल्या मान्यतेनुसार अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या एकुण विद्यार्थ्यांची संख्या, विद्यार्थ्यांना मिळालेल्या रोजगार/स्वंयम रोजगार, त्यांनी स्वत: स्थापन केलेला उद्योग किंवा धंदा इत्यादीची माहिती देणे अनिवार्य आहे. |
| १४ | उपरोक्त सर्व नियमामध्ये आवश्यकतेनुसार बदल करण्याचे अधिकार विद्यापीठ प्रशासनाकडे राहतील.त्याचे पालन करणे सर्व संस्था/महाविद्यालयावर बंधनकारक राहील. तसेच आवश्यक अर्हता धारण करणारे तज्ञ शिक्षक नेमणे आवश्यक राहील. |

| | |
|---|---|
| १५ | संस्था/महाविद्यालयांना व अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी मान्यता मिळाल्यांनतर सदर अभ्यासक्रम मान्यता देण्यात आलेल्या ठिकाणी सुरु ठेवणे संस्था/महाविद्यालयावर बंधनकारक आहे. इतर संस्था/महाविद्यालयाच्या मार्फत सदर अभ्यासक्रम त्याच ठिकाणी अथवा इतरत्र चालविता येणार नाही.तसे आढळल्यास संस्था/महाविद्यालयाची मान्यता विहित प्रक्रियेअंती संपुष्टात आणण्यात येऊन दंडात्मक कार्यवाही करण्याचे अधिकार विद्यापीठास आहेत. |
| १६ | मान्यता देण्यात आलेल्या कालावधीत संस्था/महाविद्यालयास भेट देऊन अभ्यासक्रमाबाबतची माहिती घेण्याचे अधिकार विद्यापीठास राहतील. तसेच मान्यता व अभ्यासक्रमाकरिता मान्यता मिळण्याकामी सादर करण्यात आलेल्या प्रस्तावानुसार व विद्यापीठाने दिलेल्या मान्यतेनुसार कार्यवाही होत नसल्याचे निदर्शनास आल्यास अथवा सदर संस्थेकडे सुरु असलेल्या अभ्यासक्रमाबाबत तक्रार प्राप्त झाल्यास सदर संस्था / महाविद्यालयावर कारवाई करण्याचे अधिकार विद्यापीठास राहतील. |
| १७ | विद्यापीठाने मान्यता दिल्यानंतर सदर अभ्यासक्रम अध्यापनाकरिता आवश्यक शिक्षक व लॅब इत्यादीबाबतची व्यवस्था स्वखर्चाने संस्था/महाविद्यालयाने करणे बंधनकारक आहे. |
| १८ | कौशल्य आधारित अभ्यासक्रम सुरु करण्याकरिता प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर तज्ञ समितीच्या भेटीकरिता येणार खर्च अर्जदार संस्था/महाविद्यालयांने करण्याचे आहे. तसेच मान्यता कालावधीमध्ये किमान तीन वेळा संस्था/महाविद्यालयाच्या तपासणीकरिता तज्ञ समितीच्या भेटीकरिता येणार खर्च अर्जदार संस्था/महाविद्यालय यांना करावा लागेल. |
| १९ | ज्या संस्थेस प्रस्तुत विद्यापीठाने कौशल्य आधारित अभ्यासक्रमाव्यतिरिक्त इतर अभ्यासक्रम सुरु करावयाचे असल्यास त्यांनी सदर अभ्यासक्रमांच्या अनुषंगाने संपूर्ण माहिती (Programme Structure with details etc.) विद्यापीठाकडे सादर करणे बंधनकारक आहे. सदर अभ्यासक्रमास विद्यापीठाची मान्यता मिळाल्यांनतर संबधित संस्थेस विद्यापीठाने मान्य केलेल्या अटी व शर्तीनुसार व निश्चित केलेल्या शुल्क इत्यादीनुसार चालविणे बंधनकारक राहील. |
| २० | सामंजस्य करार (MoU) करणाऱ्या संस्था/महाविद्यालय यांनी पॅरामेडीकल अभ्यासक्रमासाठी सुरक्षित ठेव अनामत रक्कम ही रु.५०,०००/- (रुपये पन्नास हजार फक्त) व पारंपारिक अभ्यासक्रमासाठी सुरक्षित ठेव अनामत रक्कम ही रु.२५,०००/- (रुपये पंचवीस हजार फक्त) इतकी राष्ट्रीयकृत बॅकेत ठेवणे बंधनकारक राहील ही सुरक्षा ठेव कौशल्य विकास केंद्राच्या परवानगीशिवाय रक्कम काढणार नाही असे प्रतिज्ञापत्र **(हमीपत्र व आश्वासन पत्र जोडपत्र १ प्रमाणे)** आवश्यक प्रमाणपत्रसह सादर करणे बंधनकारक राहील. |

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
## कौशल्य विकास केंद्र
## ( सामंजस्य करार (MoU) व शुल्क अद्यावत नियमावली

| सामंजस्य करार (MoU) नियमावली | |
|---|---|
| १) | कौशल्यविषय अर्हता व शैक्षणिक आराखडा यासंदर्भात राष्ट्रीय, राज्यस्तरीय धोरणानुसार विद्यापीठाकडून विहित करण्यात आलेल्या विविध पदव्या, पदविका,प्रगत पदविका व प्रमाणपत्र पाठयक्रम यांसाठी आणि असे पाठयक्रम चालविण्याच्या प्रक्रियेत सहभागी असलेले तज्ञ यांच्याकरिता विद्यापीठाकडून मान्यता मागणा-या,खाजगी कौशल्य शिक्षण प्रदाता परिसंस्थाचे व्यवस्थापन,विहित नमुन्यात,त्या खाजगी कौशल्य शिक्षण प्रदाता परिसंस्थाकडून चालविण्यात येणा-या अध्ययनक्रमांची संपूर्ण माहिती आणि नमुन्यामध्ये मागितलेली इतर माहिती यांसह,ज्या वर्षापासून मान्यता मागण्यात आली असेल त्याच्या अगोदरच्या वर्षाच्या जानेवारी ते सप्टेंबर महिन्याच्या शेवटच्या दिवसापूर्वी मा.समन्वयक, कौशल्य विकास केंद्र, यांच्यानावे अर्ज करतील तसेच सामंजस्य कराराव्दारे पात्र विद्यार्थ्यांना ३ महिने, ६ महिने व १ वर्षे कालावधीचे प्रमाणपत्र अभ्यासक्रम उपलब्ध करुन देता येतील. |
| २) | सामंजस्य करार (MoU) हा विद्यापीठाने विहित केलेल्या तरतुदीनुसार आवश्यक कागदपत्रासह सादर करणे हे संस्था/महाविद्यालयावर बंधनकारक राहील. अभ्यासक्रमाची रचना व परिक्षेचे स्वरुप इत्यादी संदर्भात कौशल्य विकास केंद्राने विहित केलेले नियमाचे व तरतुदीचे तंतोतंत पालन करणे संस्था/महाविद्यालयांस बंधनकारक राहील. |
| ३) | विद्यापीठाने मान्यता दिलेले अभ्यासक्रम Blended Mode व्दारे चालविण्याची मुभा संस्था/महाविद्यालयास राहील. परंतु ज्या अभ्यासक्रम प्रात्यक्षिकबाबी Blended Mode पूर्ण करता येणार नाही. |
| ४) | सामंजस्य कराराव्दारे (MoU) अभ्यासक्रम घेवू इच्छिणाऱ्या संस्थेचा/महाविद्यालयाचा नोंदणीचा कालावधी किमान तीन वर्षे पूर्ण केलेला असावा. व संस्था/महाविद्यालयाचे मागील किमान २ वर्षांचा लेखापरीक्षण अहवाल सादर करणे आवश्यक आहे. परंतु शासकीय अथवा निमशासकीय संस्थाना वरीलप्रमाणे लेखापरिक्षण सादर करण्याची आवश्यकता राहाणार नाही. परंतु अशा संस्थानी लेखापरिक्षण झाल्याचे प्रमाणित करुन देणे आवश्यक राहील. तसेच सामंजस्य करार (MoU) कालावधी एकुण ५ वर्ष असेल. ५ वर्षे मान्यता कालावधी संपल्यानंतर पुन्हा नव्याने सामंजस्य करार करणे गरजेचे आहे तसेच प्रस्तुत विद्यापीठ कौशल्य विकास केंद्राने ठरविल्याप्रमाणे प्रती अभ्यासक्रम शुल्क विद्यापीठात जमा करणे अनिवार्य आहे. |
| ५) | सामंजस्य कराराव्दारे (MoU) संस्था/महाविद्यालयाची मान्यता ५ वर्ष कालावधीसाठी येईल. |
| ६) | सामंजस्य कराराव्दारे (MoU) मान्यता देण्यात आलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने सुरु केलेल्या अभ्यासक्रमाच्या एकुण शुल्काच्या २५% वाटा विद्यापीठाचा राहील. |

| | |
|---|---|
| ७) | सामंजस्य कराराच्या माध्यमातून चालविण्यात येणारा अभ्यासक्रम यशस्वीरित्या पूर्ण झाल्यानंतर कौशल्य विकास केंद्र व संबंधित महाविद्यालय/संस्था यांचे बोधचिन्ह असलेले संयुक्त प्रमाणपत्र यशस्वी विद्यार्थ्यांना देणे बंधकारक आहे. |
| ८) | कौशल्य विकास केंद्राकडून सामंजस्य कराराच्या माध्यमातून जे अभ्यासक्रम घेतले आहेत त्याच अभ्यासक्रमाबाबत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर व कौशल्य विकास केंद्र संलग्न असा उल्लेख संबंधित संस्था/महाविद्यालयास करणे बंधनकारक राहील. |
| ९) | संबंधित अभ्यासक्रमाची जाहिरात करताना त्याचा मसुदा कौशल्य विकास केंद्राकडून मान्य करून घेणे संस्था/महाविद्यालयास बंधनकारक राहील. तसेच सदर अभ्यासक्रम कौशल्य विकास केंद्राकडे मान्य केल्याप्रमाणे व विहित केलेल्या तरतुदीनुसार असणे बंधनकारक राहील. |
| १०) | विद्यापीठ परिसराबाहेरील सामंजस्य करार (MoU) अंतर्गत चालविण्यात येणाऱ्या कोर्स आवश्यक त्या सर्व बाबी (शिक्षक, पायाभूत सुविधा, प्रयोगशाळा, ग्रंथालय इत्यादी) ची पुर्तता करण्याची जबाबदारी संबधित संस्थेवर राहील या बाबत विद्यापीठाची जबाबदारी असणार नाही. तसेच याबाबत सादर करण्यात आलेली माहिती चुकीची आढळल्यास संबधित संस्था/महाविद्यालयास वरील प्रचलित कायदयानुसार कार्यवाही करण्याचा अधिकार विद्यापीठाचा आहे. |
| ११) | विद्यापीठ परिसरामध्ये सामंजस्य करार (MoU) अंतर्गत चालविण्यात येणाऱ्या कोर्स (अभ्यासक्रम) बाबत आवश्यक त्या पायाभूत सुविधा, वर्गखोल्या ग्रंथालय, प्रयोगशाळा इत्यादी.) पुरविण्यासंबधी अधिकार व विद्यापीठाच्या व संस्थेचा शुल्काचा वाटा याबाबत निर्णय घेण्याचे अधिकार विद्यापीठास राहतील. |
| १२) | सामंजस्य करार (MoU) करण्यापूर्वी संस्था/महाविद्यालय यांना तज्ञ समितीमार्फत भेट देण्यात येईल. प्रत्यक्ष भेट देवून सोई सुविधाची पडताळणी करण्यात येईल. सदर समितीच्या भेटीचा सर्व प्रवास खर्च व अनुषंगीक खर्च हे संबधित संस्था यांनी करावयाचा आहे. तसेच मान्यता कालावधी मध्ये विद्यापीठाची तज्ञ समिती संस्थेस ५ वेळा भेट देईल याकरिता होणा-या खर्चाची तरतूद करण्याची जबाबदारी संस्थेची राहील. |
| १३) | सामंजस्य करार (MoU) अंतर्गत आकारण्यात आलेली अभ्यासक्रम शुल्काची रक्कम सर्व करांसह (Tax) भरायची जबाबदारी ही संबंधीत संस्था/महाविद्याल यांच्यावर राहील. |
| १४) | सामंजस्य करार (MoU) करणाऱ्या संस्था/महाविद्यालय यांनी पॅरामेडीकल अभ्यासक्रमासाठी सुरक्षित ठेव अनामत रक्कम ही रु.५०,०००/- (रुपये पन्नास हजार फक्त) व पारंपारिक अभ्यासक्रमासाठी सुरक्षित ठेव अनामत रक्कम ही रु.२५,०००/- (रुपये पंचवीस हजार फक्त) इतकी राष्ट्रीयकृत बॅकेत ठेवणे बंधनकारक राहील ही सुरक्षा ठेव कौशल्य विकास केंद्राच्या परवानगीशिवाय रक्कम काढणार नाही असे प्रतिज्ञापत्र **(हमीपत्र व आश्वासन पत्र जोडपत्र १ प्रमाणे)** आवश्यक प्रमाणपत्रसह सादर करणे बंधनकारक राहील. |

| | |
|---|---|
| १५) | सामंजस्य करार (MoU) करणाऱ्या संस्थेच्या प्रत्येक कोर्स निहाय, कौशल्य विकास केंद्राच्या नियमानुसार मान्यता शुल्क विहित केल्याप्रमाणे आकारण्यात येईल. |

**<u>शुक्ल तक्ता</u>**

| अ.क्र. | प्रथम मान्यता शुल्क | पॅरामेडीकल कोर्से (प्रती अभ्यासक्रम) | पारंपारिक कोर्से (प्रती अभ्यासक्रम) | कालावधी |
|---|---|---|---|---|
| १ | प्रथम मान्यता शुल्क | २५०००/- | १५०००/- | ५ वर्षाकरिता |

| | |
|---|---|
| १६) | सामंजस्य करार (MoU) करत असताना विविध खालीलप्रमाणे कागदपत्रे सोबत जोडून देणे आवश्यक आहे.<br>१) संस्था नोंदणीकृत असल्याचे पत्र - नोंदणी प्रकार व नोंदणी क्रमांक<br>२) संस्थेची जागेची कागदपत्रे- संस्थेचा नावाचा ७/१२ किंवा संस्थेच्या नावाने भाडेकरारपत्र<br>३) संस्थेचे स्वरुप - खाजगी/ सहकारी /धर्मादाय ट्रस्ट/प्रायव्हेट लिमिटेड कंपनी/ सामाजिक संस्था/ एन.जी.ओ<br>४) संस्थेचा मागील तीन वर्षाचा लेखापरीक्षण अहवाल<br>५) संस्थेच्या नावे बँक खात्याचे पासबुक - बँकेचे नाव व खाते क्रमांक<br>६) संपर्क अधिकाऱ्याचे नाव, हुद्दा, फोन नं. व ई-मेल आयडी<br>७) १०० रु.जनरल स्टँप पेपर- ३ (Bond Paper)<br>८) सुरक्षा ठेव प्रतिज्ञापत्र व मुदत ठेव प्रमाणपत्र सांक्षाकिंत प्रत. |